आकाशवाणी पुणे
प्रादेशिक वृत्त विभाग
पुणे वृत्तांत
वेळ- संध्याकाळी 06.00 वा.

दिनांक : 10.11.2026 **वार : मंगळवार**

पाडवा

दिवाळी सणात एक महत्त्वाचा दिवस असलेल्या पाडव्यानिमित्त आज पुण्यात उत्साह पाहायला मिळतो आहे. पाडव्यानिमित्त काही संस्थामार्फत आज शहर आणि उपनगरात पाडवा पहाट अंतर्गत संगीतमय कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं होते, आजचा दिवस हा साडे ३ मुहूर्तांपैकी एक असल्याने बाजारपेठेत देखील ग्राहकांची खरेदीसाठी गर्दी दिसते आहे.

अनुदान प्रणाली

पुणे महापालिकेच्या विविध कल्याणकारी योजनांचं अनुदान थेट नागरिकांच्या बँक खात्यात जमा करण्यासाठी वापरली जाणारी लाभार्थी व्यवस्थापन प्रणाली अद्ययावत केली जाणार आहे. या कामासाठी आणि पुढील तीन वर्षांच्या देखभालीसाठी जीएसटीसह एकंदर ६९ लाख ५६ हजार रुपये खर्च होणार आहेत. या प्रस्तावाला स्थायी समितीनं मान्यता दिल्याची माहिती अध्यक्ष श्रीनाथ भिमाले यांनी दिली. नव्या प्रणालीमुळे लाभार्थ्यांची माहिती सुरक्षित राहून अनुदान वितरणाची प्रक्रिया अधिक सुलभ होण्यास मदत होणार आहे.

कचरा व्यवस्थापन

पिंपरी-चिंचवडमधील एमआयडीसी परिसरात कंपन्यांमध्ये महिनाभर कचरा उचलण्यासाठी गाडी येत नसल्याच्या उद्योजकांच्या तक्रारी आहेत. घातक औद्योगिक कचऱ्याची विल्हेवाट लावण्याचीही पुरेशी व्यवस्था नसल्याचे उद्योजकांचे म्हणणे आहे. नियमित कचरा संकलन, पुरेशा गाड्या आणि अनधिकृत पैशांच्या मागणीची चौकशी करण्याची मागणी उद्योजकांनी केली आहे.

दरम्यान, कचरा संकलनासाठी गाड्यांची संख्या वाढविण्यात येईल आणि तक्रारींची चौकशी केली जाईल, असे महापालिका प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

गाळमुक्त धरण

'गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार' अभियानांतर्गत पुणे जिल्ह्यात गाळ काढण्याची एकंदर २११ कामं प्रस्तावित आहेत. गाळ शेतापर्यंत वाहून नेण्यासाठी प्रतिघनमीटर ३४ रुपये ७५ पैसे अनुदान दिलं जाणार आहे. एका एकरासाठी कमाल १५ हजार रुपये, तर दोन एकरांसाठी ३० हजार ५०० रुपयांपर्यंत अनुदान मिळणार आहे. यात अल्प आणि अत्यल्पभूधारक शेतकरी, विधवा, दिव्यांग तसंच आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांना प्राधान्य दिलं जाणार आहे.

सोयाबीन

यंदाच्या खरीप हंगामात दीर्घकाळ पावसाच्या खंडाचा फटका पुणे जिल्ह्यातील शेतीला बसला आहे. जिल्ह्यात सोयाबीनच्या उत्पादकतेत २० ते २२ टक्क्यांनी, तर मक्याच्या उत्पादनात सुमारे १५ टक्क्यांनी घट झाली आहे. जिल्ह्यातील १३ तालुक्यांमधील विविध भागांत प्रतिकूल हवामानामुळे पिकांच्या वाढीवर परिणाम झाला आहे. गेल्या काही आठवड्यांत कृषी विभागाकडून घेण्यात आलेल्या पीक कापणी प्रयोगांमधून सोयाबीन आणि मक्याच्या उत्पादकतेतील घट स्पष्ट झाली आहे.

डेंग्यू

डेंग्यूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी पुणे महापालिकेने बांधकाम आस्थापनांवर कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत. बांधकामांच्या ठिकाणी साचणाऱ्या पाण्यामुळे डासांची उत्पत्ती होत असल्यामुळे शहरातील एक हजारांहून अधिक बांधकामस्थळांना नोटिसा बजावण्यात आल्या आहेत.

संबंधित ठिकाणी नियमित तपासणी करून प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याचे निर्देश देण्यात आले असून नियमांचे पालन न करणाऱ्या आस्थापनांवर दंडात्मक कारवाई करण्यात येणार आहे. डेंग्यूचा प्रसार रोखण्यासाठी आरोग्य विभाग आणि इतर संबंधित विभागांनी समन्वयाने काम करावे, असे निर्देश महापालिका प्रशासनाने दिले आहेत.

चाराछावणी

पुण्यातील भटक्या आणि बेवारस जनावरांसाठी तात्पुरत्या चारा छावण्या आणि पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्याचा प्रस्ताव महापालिकेच्या स्थायी समितीपुढे मांडण्यात आला आहे. स्थायी समितीचे सदस्य सुहास टिंगरे यांनी हा प्रस्ताव दिला. शहरात एक दिवसाआड पाणीपुरवठा सुरू झाल्यास जनावरांना पाणी मिळणं कठीण होऊ शकतं, या पार्श्वभूमीवर ही व्यवस्था सुचवण्यात आली आहे. यात जनावरांची संख्या जास्त असलेल्या भागात छावण्या, तर चौक आणि मोकळ्या जागांवर पाण्याची भांडी किंवा टाक्या ठेवण्याचं प्रस्तावित आहे.

सणस मैदानावर

पुण्यातील बाबुराव सणस मैदानावर वैयक्तिक सराव करणाऱ्या खेळाडूंना आता शुल्क भरावे लागणार आहे. वाढत्या गर्दीमुळे सिंथेटिक ट्रॅकचे नुकसान टाळण्यासाठी १८ वर्षांखालील खेळाडूंना मासिक ३०० रुपये, तर १८ वर्षांवरील खेळाडूंना ६०० रुपये शुल्क प्रस्तावित करण्यात आले आहे. खेळाडूंना मासिक, तीन महिने, सहा महिने आणि वार्षिक असे चार प्रकारचे पास उपलब्ध करून देण्याचे नियोजन आहे. या नव्या धोरणाचा प्रस्ताव क्रीडा समितीमार्फत स्थायी समिती आणि महापालिकेच्या मुख्य सभेच्या मान्यतेसाठी ठेवण्यात आला आहे.

टेनिस

पुणे मेट्रोपॉलिटन जिल्हा टेनिस संघटनेच्या मानांकन ब्रॉन्झ सिरीज टेनिस स्पर्धेत पुण्याच्या कनिष्का नारूकाने १२ आणि १४ वर्षांखालील मुलींच्या दोन्ही गटांत विजेतेपद मिळवले. १२ वर्षांखालील मुलांच्या अंतिम सामन्यात आरव कुलकर्णीने विहान देवधरेचा पराभव केला तर मुलींच्या गटात कनिष्का नारूकाने अन्वी साहूवर चार-एक, चार-शून्य अशी मात केली. १४ वर्षांखालील मुलांच्या गटात विआन पेंडुकरने आरुष देशपांडेचा पराभव करून विजेतेपद मिळवले असून मुलींच्या गटात कनिष्काने देवहूती चौहानचा पराभव केला.

हा होता, आजचा पुणे वृत्तांत उद्या पुन्हा भेटू विविधभारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार!